# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक ०४/०७/२०२३

---

## कार्यवृत्त

आज दिनांक ०४/०७/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम, आरोग्य, आस्थापना, नगर रचना व पाणी पुरवठा, विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र | विषय |
|---|---|
| | **बांधकाम विभाग** |
| १ | जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत नागरि दलित इतर वस्ती सुधारणा करणे या योजनेमधून कामांना मंजूरी देणे बाबत |
| | **आरोग्य विभाग** |
| २ | नगरपरिषद मलकापूरच्या क्षेपण भूमीवर जमा होणाऱ्या कचऱ्याचे विक्री करणे बाबत |
| | **आस्थापना विभाग** |
| ३ | आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्याबाबत |
| | **नगर रचना विभाग** |
| ४ | मलकापूर शहराच्या प्रारूप विकास योजनेवर (दुसरी सुधारित +वाढीव हद्द) प्राप्त सूचना व हरकतींच्या अनुषंगाने नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) नुसार निर्णय घेणे व कलम ३० (१) अन्वये प्रारूप विकास योजना शासनास मंजुरातीस्तव सादर करण्यास मंजुरी देणे. |
| ५ | नगरपरिषद मलकापूर येथे महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे, श्रेणी वाढ व नियंत्रण) (सुधारणा) अधिनियम २०२१ नुसार गुंठेवारी विकास नियमित करण्याकरिता कार्यवाही करणे बाबत |
| | **पाणी पुरवठा विभाग** |
| ६ | चाळीसबिघा भागात डॉ अरविंद कोलते यांचा दवाखाना ते डॉ विपुल चोपडे दवाखाना ते मिश्रा यांचे घर ते रुपेश श्रीश्रीमाल यांचे घरापर्यंत ६ इंची पीव्हीसी पाईपलाईन टाकण्याबाबत. |
| ७ | मड पंप विकत घेणे बाबत. |

**विषय क्र.१ :- जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत नागरि दलित इतर वस्ती सुधारणा करणे या योजनेमधून कामांना मंजूरी देणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा. आ. धीरज रामभाऊ लिंगाडे विधान परिषद सदस्य अमरावती पदवीधर मतदार संघ यांचे पत्र क्र. ८८/२०२३ प्राप्त दिनांक २८/०६/२०२३ अन्वये जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ अंतर्गत नागरी दलित इतर वस्ती सुधारणा करणे या योजने मधून नगरपरिषद हद्दीतील खालील कामांचा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले आहे.

१) नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. १४ माता महाकाली नगर प्रभाग मधील बुलढाणा रोड पासून माळी भवन पर्यंत डांबरीकरण रस्ता व दोन्ही बाजूस पेव्हर बसविणे.

तरी उपरोक्त कामाकरिता संबंधित विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यास व सदर कामास येणारा खर्च नागरि दलीतेत्तर वस्ती सुधार योजना मधून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.२ :- नगरपरिषद मलकापूरच्या क्षेपण भूमीवर जमा होणाऱ्या कचऱ्याचे विक्री करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून प्र. आरोग्य निरीक्षक आरोग्य विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार न.प. मलकापूरच्या क्षेपणभूमीवर जमा होणारा ओला कचरा यावर प्रक्रिया करून खत तयार करण्यात आलेले असून हे खत तपासणीसाठी पाठवण्यात आलेले आहे. सदर तपासणीचा अहवाल आल्यावर हे खत Harit Brand साठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान संचालक यांना सादर करावे लागेल. तसेच सदर Harit Brand मान्यता मिळेपर्यंत क्षेपणभूमीवर असलेल्या MRF शेड मधून निघणारा इतर कचरा जसे की विविध प्रकारचे प्लास्टिक, रबर, कापड व इत्यादी यांची विक्री करण्यासाठी दर पत्रके सादर करून निविदा प्रक्रिया राबवण्याच्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.३ :- आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून वरिष्ठ लिपिक आस्थापना विभाग यांनी सादर केलेला अहवालानुसार मलकापूर नगरपरिषद येथील श्री माधव दे. कुटे, राज्यसंवर्ग कर्मचारी कर निर्धारण व प्रशासकीय सेवा यांची एकाच पदावर १२ वर्षे नियमित सेवा झालेली असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार मा. अध्यक्ष पदोन्नती समिति, तथा जिल्हा प्रशासन अधिकारी (न.वि.शा.) जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांचे कडील जा. क्र. दि. १०/०३/२०२३ रोजीचे इतिवृत्त नुसार एकाच पदावर १२ वर्षे नियमित सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याचे नमूद केलेले आहे.

त्या अनुषंगाने श्री माधव दे. कुटे यांना वरील इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे एकाच पदावर १२ वर्षे नियमित सेवा झाल्यामुळे आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ दिनांक ०१/०२/२०२२ पासून देण्यास ही सभा मंजुरात देत आहे.

**विषय क्र.४ :- मलकापूर शहराच्या प्रारूप विकास योजनेवर (दुसरी सुधारित +वाढीव हद्द) प्राप्त सूचना व हरकतींच्या अनुषंगाने नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) नुसार निर्णय घेणे व कलम ३० (१) अन्वये प्रारूप विकास योजना शासनास मंजुरातीस्तव सादर करण्यास मंजुरी देणे.**

मलकापूर नगर परिषद चे प्रारूप विकास योजना (दुसरी सुधारित + वाढीव हद्द) महाराष्ट्र प्रादेशिक योजना व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम २६ (१) मधील तरतुदीनुसार दि. ०२/०१/२०२३ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

प्रसिद्ध प्रारूप विकास योजनेवर प्राप्त झालेल्या सूचना व हरकतदारांना सुनावणी देऊन नियोजन प्राधिकरणास अहवाल सादर करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये दि. ०८/०३/२०२३ रोजी नियोजन समिती गठित करण्यात आलेली आहे.

नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता तो सर्वसाधारण योग्य असल्याचे मत आहे त्यामुळे सदर अहवालात मान्य करण्यात आला.

उपरोक्त अनुषंगाने कलम २६ (१) अन्वये प्रसिद्ध प्रारूप विकास योजनेमध्ये व विकास यंत्रणा व प्रोत्साहन नियमावली मध्ये झालेल्या बदलाबाबतची सूची नागरिकांच्या अवलोकनार्थ अधिनियमाचे कलम २८ (४) मधील तरतुदीनुसार प्रसिद्ध करण्यास व प्रारूप विकास योजना शासन कलम ३० नुसार मंजुरातीस्तव सादर करण्यासाठी मंजुरी देण्यात येत आहे.

नियोजन समितीने दि. १९/०६/२०२३ च्या पत्रान्वये अहवाल सादर करण्यास अपेक्षिलेल्या मुदत वाढीस मंजुरी देण्यात येत आहे.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने मुख्याधिकारी यांनी पुढील प्रशासनिक कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांनी पुढील कार्यवाही करावी.

**विषय क्र.५ :- नगरपरिषद मलकापूर येथे महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे, श्रेणी वाढ व नियंत्रण) (सुधारणा) अधिनियम २०२१ नुसार गुंठेवारी विकास नियमित करण्याकरिता कार्यवाही करणे बाबत.**

मलकापूर नगर परिषद हद्दीतील नागरीकांमार्फत त्यांच्या मालकीचे/ ताब्यातील भूखंड तसेच बांधकामे नियमाकुल/ नियमित करून मिळण्याकरिता अर्ज प्राप्त झालेले आहेत.

महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमितीकरण, श्रेणी वाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ नुसार उक्त अधिनियम अमलात आल्याचे दिनांक पासून सहा महिन्याचे आत किंवा नियोजन प्राधिकरण परवानगी देईल, अशा वाढवून दिलेल्या मुदतीत भूखंड धारकास मुखंड धारकांनी गुंठेवारी विकास नियामावाधीन करण्यासाठी अर्ज स्वीकारण्याचे प्रावधान आहे.

तसेच महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमितीकरण, श्रेणी वाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ मध्ये सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनाच्या निदर्शनास आल्याने दि. १२ मार्च २०२१ चे महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमितीकरण, श्रेणी वाढ व नियंत्रण) (सुधारणा) अधिनियम २०२१ द्वारे महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमितीकरण, श्रेणी वाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ कलम ३ मधील पोट कलम (१) मध्ये ०१ जानेवारी २००१ रोजी ऐवजी ३१ डिसेंबर २०२० रोजी हा मजकूर दाखल करण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे.

त्यानुसार दिनांक ३१/१२/२०२० पूर्वी झालेला मलकापूर नगरपरिषद हद्दीतील गुंठेवारी विकास नियमाकुल करणे बाबत पुढील कार्यवाही करण्याकरिता व त्या कामी येणाऱ्या अनुषंगिक खर्चास ही सभा मंजुरात देत आहे.

उपरोक्त ठरावाचे अनुषंगाने मुख्याधिकारी यांनी पुढील प्रशासनिक कार्यवाहीस करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने मुख्याधिकारी नगरपरिषद मलकापूर यांनी पुढील कार्यवाही करावी.

**विषय क्र.६ :- चाळीसबिघा भागात डॉ अरविंद कोलते यांचा दवाखाना ते डॉ विपुल चोपडे दवाखाना ते मिश्रा यांचे घर ते रुपेश श्रीश्रीमाल यांचे घरापर्यंत ६ इंची पीव्हीसी पाईपलाईन टाकण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून पाणीपुरवठा अभियंता यांनी सादर केलेला अहवालानुसार चाळीस बिघा भागात डॉ अरविंद कोलते यांचा दवाखाना ते डॉ विपुल चोपडे दवाखाना ते मिश्रा यांचे घर ते रुपेश श्रीश्रीमाल यांचे घरापर्यंत ६ इंची पीव्हीसी पाईपलाईन टाकण्याबाबत प्रहार जनशक्ती पक्ष उपजिल्हाप्रमुख व सदर भागाचे नागरिकांचे

निवेदन प्राप्त झालेले असून सदर भागात जुनी ३ इंची सिमेंट पाईपलाईन अस्तित्वात असून कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याबाबत नागरिकांच्या तक्रारी प्राप्त असून काही नागरिकांना पाणीच जात नाही. तरी सदर भागात ६ इंची पीव्हीसी पाईपलाईन टाकण्यास व येणारा खर्च न.प. निधी/ नागरी दलीतेत्तर निधी/ १५ वित्त आयोग निधी/ आमदार/ खासदार निधी नगरोत्थान/ वैशिष्ट्यपूर्ण व इतर उपलब्ध निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.७ :- मड पंप विकत घेणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून पाणीपुरवठा अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मलकापूर नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागातील क्लारी फॅक्युलेटर, सेटलिंग टॅंक, नवीन फिल्टरच्या खालील चेंबर मध्ये तसेच ड्रेनेजच्या पाईपलाईनच्या चेंबरमध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणात गाळ जमा होतो. त्यामुळे जलशुद्धीकरणा करिता मोठ्या अडचणी निर्माण होऊन पाईपलाईन चोकअप होऊन मोठया समस्या निर्माण होत असतात. त्यामुळे वारंवार सदर गाळ काढणे गरजेचे असते याकरिता मुव्हेबल पद्धतीचा मड पंप घेण्यास व येणारा खर्च न.प. निधी अथवा १५ वा वित्त आयोग निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**
**नगरपरिषद मलकापूर**